# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail: roamravati@dtemaharashtra.gov.in Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७२१३


**परीपत्रक**

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/वेतन/२०१८/ 515

दिनांक :- 22 FEB 2018

**विषय :- राज्यातील विनाअनुदानित संस्थेमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वेळेवर वेतन मिळत नसल्याबाबत प्राप्त होणा-या तक्रारीबाबत.**

**संदर्भ :-** १. मा.संचालक, तंशिस., म.रा., मुंबई यांचे पत्र :- २/एनजीसी/वेतन/२०१८/१९२ दि. ५/२/२०१८.

२. १०/एनजीपी/वेतन तक्रारी/२०१८/१३९ दि. ७/२/२०१८.

३. या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक :- विकाअ/शिक्षण/माहीती/२०१५/२३३६ दि. १६ सप्टे २०१५.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता प्रसिध्द केलेल्या ॲप्रुवल प्रोसेस हॅंडबुक मधील प्रकरण ६ मधील परिशिष्ट ६.४ मधील तरतुदी आणि महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचा Maharashtra Act No.XXXVII of १९९७ मधील तरतुदींचे अवलोकन करुन, राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व व्यावसायिक विनाअनुदानित पदविका अभ्याक्रमांच्या संस्थांना सुचित करण्यात येते की, विनाअनुदानित संस्थेत कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना त्यांचे वेतन व इतर अनुषंगिक देय भत्ते नियमीत वेळेवर अदा करण्यात यावेत. तसेच राज्यातील विनाअनुदानित संस्थामधील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वेतन देण्याबाबत या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक २ अन्वये तसेच त्यासोसबत जोडलेल्या तंत्रशिक्षण संचालनालय., म.रा., मुंबई यांचे परिपत्रकान्वये यापूर्वीच निर्देश देण्यात आलेले आहेत.

उपरोक्त प्रमाणे व्यावसायिक विनाअनुदानित पदविका अभ्याक्रमाच्या संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वेतन व इतर देय भत्ते यांचे नियमीत प्रदान होत नसल्याच्या तक्रारी/निवेदने या कार्यालयास तसेच संचालनालयास प्राप्त झाल्यास व सदर निवेदनांमध्ये /तक्रारीमध्ये तथ्य आढळुन आल्यास या बाबीची गंभीर दखल घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी. तसेच याबाबत संबंधित संस्थेबाबत शासनामार्फत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/संबंधित शिखर संस्था आणि महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडे पुढील कारवाई करणेसाठी संचालनालयास शिफारस करण्यात येईल व त्यामुळे होणा-या पुढील परिणामांस संस्था सर्वस्वी जबाबदार असेल.याची नोंद घ्यावी. सोबत संचालनालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक १ व २ चे पत्र जोडलेले आहे.

**सहपत्रे :- वरीलप्रमाणे**

**(डॉ. डी.व्ही. जाधव)**
सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :-** १. प्राचार्य, सर्व व्यावसायिक विना अनुदानित पदवी व पदविका संस्था त्यांना कळविण्यात येते की, वरील काटेकोर अमलबजावणी करावी.

२. प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in  Website : www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

जा.क्र.१०/एनजीपी/वेतन तक्रारी/२०१८/१३९
दिनांक : ७.२.२०१८

विषय : राज्यातील व्यावसायीक विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वेळेवर वेतन मिळत नसल्याबाबत प्राप्त होणा-या तक्रारींबाबत.

संदर्भ : संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/एनजीसी/तक्रार/२०१५/११९७, दि.१.०९.२०१५

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी शै. व. २०१८-१९ करीता प्रसिध्द केलेल्या अॅप्रुवल प्रासेस हॅन्डबुक मधील प्रकरण ६ मधील परिशिष्ठ ६.४ मधील तरतुदी आणि महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचा Maharashtra Act No. XXXVIII of 1997 मधील तरतुदींचे अवलोकन करुन, महाराष्ट्र राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व व्यावसायिक विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांना सुचित करण्यात येते की, विनाअनुदानित संस्थेत कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना त्यांचे वेतन व इतर अनुषंगिक देय भत्ते नियमीत वेळेवर अदा करण्यात यावेत. राज्यातील विनाअनुदानित संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वेळेवर वेतन देण्याबाबत संचालनालयाच्या संदर्भाधीन परिपत्रकान्वये यापूर्वीच निर्देश देण्यात आलेले आहेत.

उपरोक्त प्रमाणे व्यावसायिक विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वेतन व इतर देय भत्ते यांचे नियमीत प्रदान होत नसल्याच्या तक्रारी / निवेदने या संचालनालयास प्राप्त झाल्यास व सदर निवेदनांमध्ये / तक्रारीमध्ये तथ्य आढळून आल्यास या बाबींची गंभीर दखल घेण्यात येईल. तसेच याबाबत संबंधित संस्थेबाबत शासनामार्फत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/संबंधित शिखर संस्था आणि महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडे पुढील कारवाई करणेसाठी संचालनालयाकडुन शिफारस करण्यात येईल व त्यामुळे होणा-या पुढील परिणामांस संस्था सर्वस्वी जबाबदार असेल, याची नोंद घ्यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :- १) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपुर यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील व्यावसायिक विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमांच्या सर्व संस्थांच्या निदर्शनास आणुन परिपत्रकाची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत निर्देशित करण्यात यावे.

२) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित .

३) कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. १६ यांना माहितीकरीता अग्रेषित

४)कार्यासन क्र. ३ यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संचालनालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दुरध्वनी - २२६२०६०१, २२६२०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

परिपत्रक

क्रमांक: २/एनजीसी/वेतन/२०१८/९९२
दिनांक : 15 FEB 2018

विषय : राज्यातील विनाअनुदानित संस्थेमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वेळेवर वेतन मिळत नसल्याबाबत प्राप्त होणा-या तक्रारींबाबत.

संदर्भ : संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/एनजीसी/तक्रार/२०१५/११९७, दि.१.०९.२०१५

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी शै. व. २०१८-१९ करीता प्रसिध्द केलेल्या ॲप्रुवल प्रोसेस हॅन्डबुक मधील प्रकरण ६ मधील परिशिष्ठ ६.४ मधील तरतुदी आणि महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, २०१६ मधील तरतुदीचे अवलोकन करुन, महाराष्ट्र राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना सुचित करण्यात येते की, विनाअनुदानित संस्थेत कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना त्यांचे वेतन व इतर अनुषंगिक देय भत्ते नियमीत वेळेवर अदा करण्यात यावेत. राज्यातील विनाअनुदानित संस्थामधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वेळेवर वेतन देण्याबाबत संचालनालयाच्या संदर्भाधीन परिपत्रकान्वये यापूर्वीच निर्देश देण्यात आले आहेत.

उपरोक्तप्रमाणे विनाअनुदानित संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वेतन व इतर देय भत्ते यांचे नियमीत प्रदान होत नसल्याची तक्रारी / निवेदने संचालनालयास प्राप्त झाल्यास, सदर निवेदनांमध्ये / तक्रारीमध्ये तथ्य आढळून आल्यास या बाबीची गंभीर दखल घेण्यात येईल. तसेच याबाबत संबंधित संस्थेबाबत शासनामार्फत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद / संबंधित शिखर संस्था आणि संलग्नीत विद्यापीठ यांचेकडे पुढील कारवाई करणेसाठी संचालनालयाकडुन शिफारस करण्यात येईल, व त्यामुळे होणा-या परिणामांस संस्था सर्वस्वी जबाबदार असेल, याची नोंद घ्यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपुर यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सर्व विनाअनुदानित संस्थांच्या निदर्शनास आणुन परिपत्रकाची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत निर्देशित करण्यात यावे.
२. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. ३अ, १०, १६ यांना माहितीकरीता.
३. कार्यासन क्र.३ यांना माहिती व संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता.